संक्षिप्त फौ.ख.क्र.१७५४/२०२१
नि.क्र. १४ लगत

(प्रकरणामध्ये स्टे नाही असे उभयपक्षाचे वकीलांनी कथन केले आहे म्हणून पुढील सरतपास शपथेवर सुरु. हिंदी मधुन मराठी अनुवाद )

**फिर्यादीतर्फे सा. क्र.१ विनोद हर्बन्सलाल वर्मा यांचा शपथेवर पुढील सरतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री यादव यांच्या मार्फत –**

१. मी चेक बाऊंसची केस आरोपीविरूध्द दाखल केलेली आहे. (नि.क्र.१६/१ सोबत दाखल असलेले ७ चेक साक्षीदारास दाखवण्यात आला.) आता मला दाखविलेला चेक आरोपीने लिहिलेला असून तो मला देण्यात आला होता. त्यावरील सही मी ओळखतो. आरोपीची सही आहे. त्यातील लिहिलेला मजकुर बरोबर आहे. मुळ चेकची ही प्रत मी दाखल केली आहे. (मुळ चेकची प्रत असल्याने सदर चेकला **नि.क्र.पी– २१/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.)

२. मी सदरचे चेक बँकमध्ये दाखल केले असता ते न वटता परत आले. इनसफिसिअंट फन्ड त्या कारणाने. मला मेमो देण्यात आले. (नि.क्र.१६/२ वर दाखल केलेले कागदपत्र साक्षीदारास दाखवण्यात आले.) हा तोच मेमो असून त्यावर बँकेचा शिक्का व सही आहे. मूळप्रत मी दाखल केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (मुळ प्रत असल्याने सदर मेमोला **नि.क्र.पी– २२/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.)

३. मेमो मिळाल्याने मी आरोपीला वकीलांमार्फत नोटीस पाठविली. (नि.क्र.१६ सोबत दाखल केलेले कागदपत्र साक्षीदारास दाखवण्यात आले.) आता मला दाखवलेली नोटीस मी ओळखतो. त्यावर माझी व वकील श्री.विकास पाटील यांची सही आहे. यातील मजकुर बरोबर आहे. आरोपीला वकीलांमार्फत नोटीसची स्थळप्रत दाखल केली आहे. (सदर नोटीसला **नि.क्र.पी– २३/पी.डब्ल्यू.१** देण्यात

येते.). नोटीस रजिस्टर पोस्टोने पाठवले. मला दाखवलेली पोस्टाची पावती मूळ प्रत मी ओळखतो. मी पोस्टामार्फत नोटीस पाठवली त्याबद्दलची पावती आहे. (सदर मुळ पावतीला **नि.क्र.पी– २४/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.).

५ सदरची नोटीस परत आली. (नि.क्र.१६ सोबत दाखल केलेला बंद लखोटा व आरपीएडी कार्ड साक्षीदारास दाखवण्यात आले.) आता मला दाखविलेला लखोटा व पोस्टाचे कार्ड मी ओळखतो. सदरचा लखोटा आरोपीने न घेतल्याने परत करण्यात आला. (सदरच्या लखोटयाला **नि.क्र.पी– २५/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते. सदर कार्डाला **नि.क्र.पी– २६/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.) (नि.क्र.१६ सोबत दाखल केलेले कागदपत्र दाखवण्यात आले.) आता मला मी दाखविलेले कागदपत्र मी ओळखतो. बँकेतून माझ्या स्टेटमेंटची सही शिक्क्याची प्रत आहे.(बँकर्स बूक इव्हीडन्स ॲक्ट प्रमाणे **नि.क्र.पी– २७/पी.डब्ल्यू.१** देण्यात येते.)

**सरतपास पूर्ण. उलटतपास आरोपीतर्फे वकीलांच्या विनंतीवरून कॉस्टवर तहकूब .**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

**(श्रीमती पी.एस.जी.चाळकर)**

दि. ०८/०७/२०२५

२रे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,पालघर